# घोषणा

**विभाग प्रमुख - ट्रॅव्हल ॲन्ड टुरिझम, शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा, गट-अ, जाहिरात क्रमांक ५२/२०१७** या पदांकरीता ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची तारीख ३ ऑगस्ट, २०१७ अशी आहे. तथापि, ट्रॅव्हल ॲन्ड टुरिझम विषयाची समकक्ष पदवी व पदव्युत्तर पदवींच्या अनुषंगाने काही उमेदवारांना तांत्रिक कारणांमुळे अर्ज भरण्यात येणा-या अडचणी लक्षात घेता, प्रस्तुत जाहिरातीकरीता ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या तारखेत दोन दिवसांची म्हणजेच दिनांक ३ ऑगस्ट, २०१७ ऐवजी दिनांक **५ ऑगस्ट, २०१७** पर्यन्त मुदतवाढ देण्यात येत आहे.

१. विहित पद्धतीने अर्ज सादर करुन ऑनलाईन शुल्क भरण्याची कार्यवाही, तसेच भरतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक ५ ऑगस्ट, २०१७ रोजी २३.५९ वाजेपर्यन्त पूर्ण** करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

२. चलनाव्दारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकमध्ये **दिनांक ७ ऑगस्ट, २०१७** पर्यन्त बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही. तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

**ठिकाण- मुंबई**
**दिनांक - ३ ऑगस्ट, २०१७**

**सचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**